# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:30.08.2026** **वार:रविवार**

---

1. 2036च्या ऑलिम्पिकच्या तयारीसाठी पाच ते पंधरा वयोगटातील क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचं प्रतिपादन
2. आदिवासी विद्यार्थांच्या सर्व मागण्यावर मुख्यमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाल्याची मंत्री अशोक उईके यांची माहिती
3. महिला क्रिकेटमध्ये, आज भारत आणि थायलंड दरम्यान टी-20 आशिया चषक सामना आणि
4. नेपाळच्या पुरात अडकेलेले राज्यातील 404 नागरिक सुरक्षित

**मोहोळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतानं क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घेण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून, 2036 च्या ऑलिम्पिकमध्ये भारताचा सहभाग आणि पदकांची संख्या वाढवण्यासाठी लहान वयापासूनच क्रीडा प्रतिभा शोधण्याची गरज केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पुण्यात आयोजित विशेष टपाल पाकिटाच्या प्रकाशन सोहळ्यात ते काल बोलत होते. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2026 या विषयावर हे विशेष पाकीट प्रकाशित करण्यात आलं. यावेळी बोलतांना मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले....

**पाच ते पंधरा वयोगटातल्या मुलांना आता आपल्याला त्या त्या खेळातली मुलं शोधली पाहिजेत, कुठल्या खेळात कुठला खेळाडू आता प्रावीण्य पुढच्या काळामध्ये मिळू शकतो तो देशाला पदक मिळवून देऊ शकतो, अशा मुलांची तयारी आपल्याला पुढच्या काळामध्ये करून घ्यायची आहे. आणि आपण नेहमी पाहतो की आपल्या सगळ्यांच्या मनामध्ये खंत नेहमीची आहे, की आपण ऑलिंपिकच्या ज्यावेळेस पदक तक्ता पाहतो, त्यावेळेला आपण वरनं नाही आपण खालनं पाहतो, आपल्याला ही एक शोकांतिका आहे. म्हणून ऑलिम्पिक मध्ये अधिकाधिक क्रीडा प्रकार आपला देश कसा सहभागी होईल याचा विचार आपण केला पाहिजे आणि खर तर ऑलिम्पिक मधल्या पदकांची जर आपण मालिका पाहिली मागच्या काळामध्ये आपण राष्ट्रकुल गेम्स असतील, नॅशनल गेम्स, एशियन गेम्स असतील किंवा किंबहुना ऑलिम्पिक असतील या सगळ्या क्रीडा प्रकारामध्ये निश्चितपणे एक चांगली प्रगती आपल्या खेळाडूंनी मागच्या काही काळामध्ये केली आहे. आता मात्र एकच आहे की 2036 चा ऑलिम्पिक त्यासाठी या देशातल्या जास्तीत जास्त पदकांची संख्या आपल्याला कशी मिळवता येईल याचं ध्येय डोळ्यासमोर ठेऊन आपण काम केलं पाहिजे.**

**गौरव**

पुण्यात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात राज्यातील हॉकी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मुरली अग्निस्वर, राजेंद्र जोशी, सलामत इराणी, फेलिक्स बर्नार्ड आणि मेघराज मूर्ती यांना राष्ट्रीय क्रीडा दिन पुरस्कार 2026 देऊन गौरवण्यात आलं.

**क्रीडादिन**

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीचं औचित्य साधून साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त रत्नागिरीत काल 'खेलेगा भारत, जितेगा भारत' या संकल्पनेवर आधारित 'रन अँड राइड' फेरी उत्साहात पार पडली. नंदुरबार इथे आयोजित करण्यात आलेल्या 'मेजर ध्यानचंद चषक' हॉकी क्रीडा स्पर्धेला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**मुख्यमंत्री-आदिवासी**

आपल्या विविध मागण्यांसाठी पुणे, नागपूर आणि नाशिक या तीन ठिकाणी आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या सरकारनं मान्य केल्याची घोषणा राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी काल केली. यासंदर्भात काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक झाली. विद्यार्थ्यांना सर्व बाबी लेखी स्वरुपात मिळतील असं सांगत आंदोलन स्थगित करण्याचं आवाहन सरकारच्या वतीने करणार असल्याचं मंत्री उईके यांनी काल सांगितलं.

**एमसीए**

मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) परिसरातील 5 उपहारगृहांचे अन्न परवाने निलंबित केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासनाला (एफडीए ला ) खडसावलं आहे आणि त्यांचं परवाना निलंबन रद्द करून ही 5 उपहारगृहं पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रविंद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सिप्ला कंपनीच्या पुण्यातल्या उत्पादन केंद्राचा औषधविक्री परवाना रद्द करणारा आदेशही एफडीएनं न्यायालयाच्या आदेशानुसार काल मागे घेतला. एफडीएनं मर्यादा ओलांडल्याचे आणि मनमानी पद्धतीनं कारभार केल्याचे ताशेरे खंडपीठाने ओढले.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमाद्वारे देश-विदेशातील जनतेशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा 137 वा भाग आहे. हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, एआयआर (AIR) न्यूजची वेबसाइट आणि 'न्यूजऑनएअर' (Newsonair) मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल.

**मृतदेह-ओळख-रत्नागिरी**

रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी बेवारस मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित, ॲपचं सादरीकरण, हैदराबादच्या सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमीत करण्यात आलं. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**अज्ञात आणि बेवारस मृतदेहांची ओळख पटवणं हे गुन्ह्याची उकल होण्यासाठी अत्यंत आवश्यक, मात्र खूपच आव्हानात्मक काम असतं. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याची संकल्पना रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी मांडली. त्यातून रेड्स अर्थात रत्नागिरी ॲडव्हान्स डेटा इंटिग्रेटेड सिस्टीम हे ॲप्लिकेशन तयार करण्यात आलं. बेवारस मृतदेहांची माहिती त्यात एकत्रित संकलित केली जाते. संबंधित मृतदेहांची उपलब्ध छायाचित्रं आणि इतर माहितीच्या आधारे एआय तंत्रज्ञानाचा वापर करून चेहऱ्याची डिजिटल प्रतिकृती तयार केली जाते. चेहरा ओळखणं कठीण असलेल्या प्रकरणांमध्येही उपलब्ध माहितीच्या आधारे संभाव्य चेहरा तयार केला जातो. बेपत्ता व्यक्तींच्या शोधासाठी चेहऱ्याची 108 विविध रूपं तयार करून तांत्रिक पद्धतीने शोध घेतला जातो. या ॲपच्या माध्यमातून आतापर्यंत 21 मृतदेहांची ओळख पटवण्यात यश आलं असून, 11 बेपत्ता व्यक्तींचा शोध घेणंही शक्य झालं आहे. या उपक्रमाची दखल आता राष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**रास्वसं-मोहन भागवत**

हिंदुत्व हे प्रत्येक मानवाच्या प्रतिष्ठेचा आदर करतं आणि एकाच सत्यापर्यंत पोहोचण्याचे विविध मार्ग स्वीकारतं; असं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केलं आहे. ते काल अमेरिकेत न्यूयॉर्कमध्ये आयोजित एक जग,एक मानवता या विषयावरील धर्मगुरूंच्या परिषदेत बोलत होते.

**जरांगे**

मराठा आरक्षणाकरता मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातल्या अंतरवाली सराटी इथे विविध मागण्यांसाठी कालपासून पुन्हा बेमुदत उपोषण सुरू केलं आहे. मागण्या मान्य न झाल्यास मुंबईत आंदोलन करायचा इशाराही जरांगे यांनी दिला आहे.

या आंदोलनाच्या समर्थनार्थ सांगलीत मराठा समाजानं जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ पोलखोल आंदोलन सुरू केलं आहे. ओबीसींच्या आरक्षणाच्या संरक्षणाच्या लढाईसाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही 1 सप्टेंबर रोजी मुंबईकडे मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे.

**<u>निवड</u>**

पुण्याच्या आंतरराष्ट्रीय रायफल नेमबाज आणि शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारविजेत्या पूजा घाटकर यांची जपानमध्ये होणाऱ्या 20व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय 10 मीटर रायफल नेमबाजी संघाच्या प्रशिक्षकपदी निवड झाली आहे.

**<u>महिला-क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये, आज भारत आणि थायलंड दरम्यानचा टी-20 आशिया चषक सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सुरू होणार आहे. हरमनप्रीत कौर भारतीय संघाचं नेतृत्व करेल, तर स्मृती मानधना उपकर्णधार असेल. दुखापतग्रस्त जेमिमाह रॉड्रिग्जच्या जागी प्रतिका रावलचा संघात समावेश करण्यात आला आहे. थायलंडने 28 तारखेला चीनवर विजय मिळवून स्पर्धेची सुरुवात केली आहे.

**<u>नेपाळ पूर-महाराष्ट्र</u>**

नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरात झालेल्या मृत्युंची संख्या 675 वर पोहोचली आहे. 2400 जण अजूनही बेपत्ता असून त्यातल्या 320 परदेशी पर्यटकांपैकी 261 जणांचा संपर्क होऊ शकलेला नाही. पुरात अडकलेले राज्यातले नागरिक आणि पर्यटकांच्या मदतीसाठी विविध पातळीवर शासकीय यंत्रणा अहोरात्र प्रयत्न करत असून सर्वजण सुरक्षितपणे त्यांच्या गावी परत पोहोचण्याकरता सतर्कतेने योग्य नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सागा इथून 41 जण काल परतले असून 106 जण नागपूरला आज पोहोचत आहेत. 143 नागरिक राज्यात सुरक्षितपणे परतीच्या मार्गावर असून राज्यातील मुंबई, पुणे, अहिल्यानगरच्या 45 पर्यटकांचा एक गट काल भारतात आला. आत्तापर्यंत प्राप्त माहितीनुसार राज्यातील 404 नागरिक सुरक्षित असून 338 नागरिकांशी संपर्क झाला आहे. अन्य 8 नागरिकांविषयीची माहिती एका ऑनलाइन लिंकद्वारे मिळाली मात्र त्यांच्याशीही संपर्क साधता आलेला नाही.

**<u>निधन</u>**

रत्नागिरी तालुक्यातल्या खानू इथले माजी नौसैनिक, पत्रकार आणि खानू ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अरुण आठल्ये यांचं काल अल्पशा आजाराने निधन झालं. ते 78 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज सकाळी आठ वाजता खानू गावात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<u>निधन-बोटेकर</u>**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी पूर्णवेळ कार्यकर्ते डॉ श्रीपाद ढेकणे यांचं काल पुण्यात कर्करोगाने निधन झालं. ते 61 वर्षांचे होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या महाराष्ट्राच्या सुकाणू समितीचे सदस्य म्हणून त्यांनी केलं होतं.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तर विदर्भात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.